# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक १९७ वा बुधवार दि.३ जानेवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







# राज्यात इंधन पुरवठा ठप्प

## टँकरचालकांच्या संपाचा फटका, भाजीपालाही महागला

मुंबई : प्रतिनिधी केंद्र सरकारविरोधात ट्रक-टँकर चालकांनी पुकारलेल्या संपाचे पडसाद आता संपूर्ण राज्यात उमटू लागले आहेत. यामुळे राज्यातील इंधन पुरवठ्याला ब्रेक लागला आहे. याचे परिणाम मुंबईतही दिसू लागले असून, बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रातील २१० पैकी निम्मे पंप बंद होण्यास सुरुवात झाली आहे. रात्रीपर्यंत पुरवठा सुरू न झाल्यास सर्व पंप ठप्प होणार, अशी माहिती पेट्रोलपंप मालक असोसिएशनने दिली आहे.



केंद्र सरकारने नव्याने केलेला रस्ते अपघात सुरक्षा कायदा जाचक व अन्यायकारक असल्याचे सांगत त्याच्या निषेधार्थ मनमाडनजीक पानेवाडी, नागापूर परिसरात असलेल्या तेल कंपन्यांच्या चालकांनी संपाचे अस्त्र उपसल्याने सोमवारी तीनही कंपन्यांतून एकही टँकर इंधन भरून बाहेर पडू शकला नाही. या संपामुळे मनमाड परिसरातील तेल प्रकल्पातून राज्यातील तब्बल १२ जिल्ह्यांत होणारा इंधनपुरवठा ठप्प झाला असून, इंधनटंचाईचे संकट ओढवले आहे.

केंद्राच्या नव्या कायद्याप्रमाणे आता इंधन टँकर वा ट्रकचा अपघात झाल्यास आणि चालक अपघातस्थळावरून पळून गेल्यास चालकाचा जामीन न होता थेट दहा वर्षे तुरुंगवास व ७ लाख रुपये दंड अशी तरतूद असल्याचे टँकर चालकांचे म्हणणे आहे. याला टँकरचालकांनी तीव्र विरोध दर्शविला असून, हा कायदा मागे घेण्यासाठी टँकरचालकांनी सोमवारी सकाळी संपाचे हत्यार उपसले. या आंदोलनाला टँकरमालकांनीही पाठिंबा दिला. यामुळे पानेवाडी, नागापूर येथील हिंदुस्तान पेट्रोलियम, भारत पेट्रोलियम आणि इंडियन ऑइल कॉर्पोरेशन या तीनही कंपन्यांतून इंधन पुरवठा बंद करण्यात आला.

येथून राज्यातील बारा जिल्ह्यांत रोज सुमारे दीड हजार टँकर भरून जातात. सोमवारी तिन्ही कंपन्यांत इंधन टँकर भरण्याचे काम सुरू होण्यापूर्वी चालकांनी आदल्या दिवसापासून इंधन भरण्यासाठी आलेल्या टँकरचालकांना टँकर भरून रवाना केले. त्यानंतर अवघे पाच-सहा टँकर भरून झाल्यावर या टँकरचालकांनी अचानक काम बंदची घोषणा केली. केंद्र सरकार, मोदी प्रशासनाविरोधात घोषणाबाजी करीत त्यांनी कोणत्याही कंपनीतून एकही टँकर भरून जाऊ दिला जाणार नाही, असा पवित्रा घेतला.

कंपनी प्रशासनाचे प्रयत्न

संप मागे घेण्याबाबत टँकर चालकांना कंपनी प्रशासनाने वारंवार विनंती केली. बीपीसीएल कंपनीत मुख्य प्रबंधक प्रशांत खर्गे यांनीही टँकरचालक, मालक यांच्याशी चर्चा केली. मात्र, तोडगा निघाला नाही. अशाच बैठका इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियममध्ये अधिकारी मीना, बर्मन यांनीही घेतल्या. पण केंद्राने कायदा मागे घेतला तरच संप मागे घेऊ, या भूमिकेवर आंदोलक ठाम आहेत.

७५ लाख लिटर इंधन ठप्प

मनमाडनजीक असलेल्या तीन महत्त्वाच्या इंधन कंपन्यांतून दररोज हजारावर टँकरमधून ७५ लाख लिटर पेट्रोल-डिझेल राज्यभरात जाते. महिनाअखेरीस तिन्ही कंपन्यांतून १२००ते १५०० टँकर भरून जातात.

या जिल्ह्यांना फटका

नाशिक, धुळे, जळगाव, अहमदनगर, अकोला, बुलढाणा, नंदुरबार, बीड, औरंगाबाद, जालना, परभणी व नांदेड जिल्ह्याला मोठा फटका बसला आहे.



भारतातील पहिल्या महिला शिक्षिका, पहिल्या मुख्याध्यापिका, स्त्रीशिक्षणाच्या जनक, विज्ञानवादी क्रांतिज्योति सावित्रीबाई फुले यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन

# जात सर्वेक्षण डेटा सार्वजनिक करा

नवी दिल्ली : बिहारमध्ये मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या सरकारने जात सर्वेक्षण केले आहे. या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने आपली आकडेवारी आणि तपशील सार्वजनिक करण्याचे आदेश मंगळवार दि. २ जानेवारी रोजी दिले. जातीच्या आधारावर केलेल्या सर्वेक्षणाचा तपशील सरकारला सार्वजनिक करावा लागेल असे न्यायालयाने म्हटले आहे.सर्वोच्च न्यायालयाने २९ जानेवारी रोजी पाटणा उच्च न्यायालयाच्या २ ऑगस्ट २०२३ च्या आदेशाला आव्हान देणा-या याचिकांवर सुनावणी ठेवली आहे, ज्याने जात-आधारित सर्वेक्षण करण्याचा बिहार सरकारचा निर्णय कायम ठेवला होता.

# धार्मिक अल्पसंख्यांक विद्यार्थी बहुल शैक्षणिक संस्थांनी पायाभूत सुविधा अनुदानासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

लातूर, दि. ०२ : धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी अनुदानित, विना अनुदानित अथवा विना अनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालिका तथा नगरपरिषद शाळा व दिव्यांग शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना २०२३-२४ मध्ये राबविण्यात येत आहे. यासाठी १५ जानेवारी २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी यांनी केले आहे. अल्पसंख्यांक विकास विभागाच्या ७ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील धार्मिक अल्पसंख्यांक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व दिव्यांग शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे. ही योजना राबविण्याबाबत अल्पसंख्याक विकास विभागाच्या २५ डिसेंबर, २०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार कळविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने संस्थाचालकांनी ७ ऑक्टोबर, २०१५ च्या निर्णयाप्रमाणे विहीत नमुन्यात रितसर परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, नवीन जिल्हाधिकारी कार्यालय, बार्शी रोड, लातूर या कार्यालयात १५ जानेवारी, २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत सादर करावेत, मुदतीनंतर प्राप्त प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, असे जिल्हा नियोजन अधिकारी श्री. रेड्डी यांनी कळविले आहे.

# नितीशकुमारांना 'इंडिया'त मोठे पद?

नवी दिल्ली : 'इंडिया' आघाडीच्या दिल्लीतील बैठकीत मिळालेल्या वागणुकीमुळे नाराज असल्याचा दावा करण्यात आलेले बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांचे मन वळविण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. नितीश यांना आघाडीचे संयोजकपद किंवा समकक्ष पद देण्याबद्दल काँग्रेसकडून घटक पक्षातील इतर नेत्यांशी चर्चा करून चाचपणी सुरू केल्याचे समजते.गेल्या १९ डिसेंबरला दिल्लीत झालेल्या बैठकीत पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचे नाव पुढे करावे, असा प्रस्ताव मांडला होता. या प्रस्तावाला दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी अनुमोदन दिले होते. अचानकपणे झालेल्या घडामोडीमुळे बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार नाराज झाले होते. ते त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेलासुद्धा हजर राहिले नव्हते.यानंतर नितीशकुमार यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याशी चर्चा करून या घटनाक्रमाबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. मुळात नितीशकुमार यांनी 'इंडिया' आघाडीतील नेत्यांना एकत्रित करण्यासाठी प्रयत्न केले होते. त्यांनीच ममता बॅनर्जी यांची भेट घेऊन त्यांनी 'इंडिया' आघाडीत आणण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. या पार्श्वभूमीवर नितीशकुमार यांची नाराजी परवडणारी नसल्याचे लक्षात आल्यानंतर काँग्रेस श्रेष्ठींनी तत्काळ पावले उचलून नितीशकुमार यांना 'इंडिया' आघाडीत संयोजककिंवा समकक्ष पद देण्याच्या संदर्भात इतर नेत्यांशी चर्चा केल्याचे सूत्रांनी सांगितले. काँग्रेसची गुरुवारी बैठक विविध राज्यांतील घटकपक्षांशी लोकसभा निवडणुकीसाठी जागावाटप व आगामी भारत न्याय यात्रेच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी काँग्रेसचे सर्व राज्यांचे प्रदेशाध्यक्ष व सरचिटणीस यांची बैठक येत्या चार जानेवारीला बोलाविली आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जागा वाटपाच्यासंदर्भात सर्व राज्यांच्या नेत्यांशी काँग्रेस श्रेष्ठींची चर्चा झालेली आहे. पक्षाच्या राष्ट्रीय आघाडी समितीनेसुद्धा सर्व राज्यांच्या नेत्यांशी चर्चा करून जागावाटपावर काय भूमिका घ्यावी, याची चर्चा झालेली आहे. बिहारच्या नेत्यांचा दबाव बिहारमधील काँग्रेसच्या नेत्यांनीसुद्धा नितीशकुमार यांना नाराज करणे परवडणारे नसून त्यांना 'इंडिया' आघाडीत पुरेसा सन्मान देण्यात यावा, अशी मागणी केली आहे. बिहारच्या नेत्यांनी नुकतीच काँग्रेस श्रेष्ठींची दिल्लीत भेट घेऊन बिहारमध्ये नितीशकुमार यांची प्रतिमा चांगली असल्याने त्यांना नाराज करता येणार नसल्याचे स्पष्ट सांगितले. यामुळेही काँग्रेस श्रेष्ठींनी तातडीने पावले उचलल्याचे सांगितले जात आहे.


**भारतातील पहिल्या महिला शिक्षिका, पहिल्या मुख्याध्यापिका, स्त्रीशिक्षणाच्या जनक, विज्ञानवादी क्रांतिज्योति सावित्रीबाई फुले यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन**





**सागर रामभाऊ तायडे**
९९२०४०३८५९,
भांडूप,मुंबई


## बायकोनेच दाखल केला नवऱ्यावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा

सोलापूर : केवळ मागासवर्गीय समाजाचा आहे म्हणून जातीवाचक शिवीगाळ, मारहाण करून हीन वागणूक दिली म्हणून सवर्ण जातीच्या व्यक्तीविरूद्ध पीडित मागासवर्गीय व्यक्तीकडून ट्रॉसिटी कायद्याखाली फिर्याद दाखल होण्याचे प्रकार नवीन नाहीत. परंतु एका महिलेने आपल्याच नवऱ्यावर ट्रॉसिटी कायद्याखाली फिर्याद नोंदविण्याचा आनोखा प्रकार पंढरपुरात घडला आहे. न्यायालयीन इतिहासात बायकोकडून स्वतःच्या नवऱ्यावर ट्रॉसिटी दाखल करण्याची ही पहिलीच घटना असल्याचे मानले जात आहे.

आंतरजातीय विवाह केलेल्या संबंधित नवरा-बायकोमध्ये बेबनाव झाल्यानंतर त्याचे लोन चक्क ट्रॉसिटी कायद्याखाली नवऱ्याविरूध्द फिर्याद नोंदवून त्याच्या अटकेपर्यंत पोहोचले आहे.

# क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांचा दौरा कार्यक्रम

लातूर दि. २ (जिमाका): राज्याच्या क्रीडा व युवक कल्याण, बंदरे विभागाचे मंत्री संजय बनसोडे हे बुधवार, ३ जानेवारी २०२४ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. बनसोडे यांचे ३ जानेवारी रोजी सकाळी ६.३० वाजता लातूर येथे आगमन होईल व शकुंतला निवासस्थान येथे राखीव. सायंकाळी ५.३० वाजता ते शकुंतला निवासस्थान येथून मोटारीने लातूर शहरातील रिंग रोडवरील पोतदार शाळेजवळील रुक्मिणी लॉन्स मंगल कार्यालाकडे प्रयाण करतील. याठिकाणी सायंकाळी ५.५६ वाजता होणाऱ्या शंकरराव बळवंतप्पा मोरगे यांच्या मुलाच्या विवाह सोहळ्यास उपस्थित राहतील. त्यानंतर सायंकाळी ६ वाजता लातूर शहरातील न्यू आदर्श कॉलनी येथील कॅम्युनिटी हॉल येथे संजय शिवशंकर चितकोटे यांच्या मुलाच्या विवाह प्रित्यर्थ स्वागत समारंभास ते उपस्थित राहतील. त्यानंतर सोयीनुसार न्यू आदर्श कॉलनी येथून शकुंतला निवासस्थानाकडे प्रयाण करतील.

# लातूर जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेचे हॉल तिकीट ऑनलाईन उपलब्ध 20 जानेवारी रोजी होणार परीक्षा

लातूर, दि. ०२ (जिमाका): येथील जवाहर नवोदय विद्यालयाच्या इयत्ता सहावी प्रवेश परीक्षेचे हॉल तिकीटऑनलाईन उपलब्ध झाले असून हे हॉल तिकिट डाऊनलोड करुन घेण्याचे आवाहन विद्यालयाचे प्राचार्य संजय पाटील यांनी केले आहे. जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता सहावी प्रवेशासाठी २० जानेवारी २०२४ रोजी प्रवेश परीक्षा होणार आहे.

जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता सहावी प्रवेशासाठी ज्यांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरले आहेत, त्यांनी परीक्षेचे हॉल तिकिट https://cbseitms.rcil.gov.in/nvs/-dminCard/-dminCard या संकेतस्थळावरून डाऊनलोड करुन घ्यावेत. विद्यार्थ्यांनी हॉल तिकीटावरील सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक आहे. नवोदय विद्यालय समितिच्या नियमानुसार परीक्षेचे माध्यम व परीक्षा केंद्र कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही. हॉल तिकिट डाऊनलोड करुन घेण्यास काही अडचण असल्यास नवोदय विद्यालय लातूरचे परीक्षा प्रभारी बी. डी. शेख (भ्रमणध्वनी क्र. ९८१७८३४९३०) किंवा व्ही. एच. खिल्लारे (भ्रमणध्वनी क्र. ९८६०५६८८४०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य श्री. पाटील यांनी केले आहे.

## संपादकीय....

# एनडीए आणि 'इंडिया'

गेल्या दोन दशकांमध्ये नितीश कुमार यांनी आपल्या विश्वासार्हतेचे खोबरे करून घेतले आहे. त्यामुळेच, त्यांच्या पक्षाची विधानसभा निवडणुकांमधील कामगिरी क्रमश: उणावत गेली आहे.लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक पार पडत नाही; तोवर आयाराम-गयाराम, सोमे-गोमे, गुलाम-मालक, निष्ठावंत-उपरे आणि अशा बऱ्याच जणांची चलती असणार आहे. ती जशी महाराष्ट्राच्या पातळीवर असेल तशीच राष्ट्रीय पातळीवरही आहे. काँग्रेसने नागपुरात स्थापना दिनाचा मेळावा घेऊन लढ्यास सज्ज असल्याचे संकेत दिले. राहुल गांधी यांची भारत न्याय यात्राही होते आहे.बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांना विरोधकांची बडी आघाडी असणाऱ्या 'इंडिया'चे निमंत्रक होण्यात अद्याप यश आलेले नाही. मात्र, नितीश यांच्या संयुक्त जनता दलाबाबत केवळ पाटण्यातच नव्हे तर दिल्लीतही विविध प्रकारच्या चर्चेला ऊत आला आहे. त्यातली एक चर्चा म्हणजे, संयुक्त जनता दल लवकरच फुटणार असून मोठा गट भारतीय जनता पक्षाकडे सरकण्याची शक्यता आहे. ही चर्चा चालू असतानाच बिहारचे माजी मुख्यमंत्री जितनराम मांझी यांनी 'नितीश कुमार कोणत्याही क्षणी पुन्हा भाजपच्या सोबत येऊ शकतात,' असे धक्कादायक विधान केले आहे. राजीव रंजन सिंह ऊर्फ ललन सिंग हे आत्तापर्यंत संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष होते. नितीश यांनी हे अध्यक्षपद आता आपल्याकडे घेतले आहे. 'माझा पक्ष माझ्या ताब्यात आहे आणि तिथे माझा शब्द अखेरचा आहे,' असा संदेश नितीश यांनी 'इंडिया' या आघाडीतील मित्रपक्षांना आणि विशेषकरून काँग्रेसला दिला आहे. गेल्या दोन दशकांमध्ये नितीश कुमार यांनी आपल्या विश्वासार्हतेचे खोबरे करून घेतले आहे. त्यामुळेच, त्यांच्या पक्षाची विधानसभा निवडणुकांमधील कामगिरी क्रमश: उणावत गेली आहे. २०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत नरेंद्र मोदी यांच्या प्रचार मोहिमेची आखणी करण्यात सिंहाचा वाटा असणाऱ्या प्रशांत किशोर यांना नितीश कुमार यांनी वर्षांपूर्वी जनता दलाचे उपाध्यक्ष केले होते. नंतर काढूनही टाकले. आता प्रशांत किशोर हे 'नितीश यांची ताकद पुरती संपली असून त्यांना लोकसभेच्या पाच जागाही मिळणे कठीण आहे,' असे सध्या सांगत आहेत. यातून दोन प्रश्न निर्माण होतात. पहिला, बिहारच्या ४० जागांवर मग बाजी कोण मारणार आहे? आणि ज्यांच्याकडे 'इंडिया'चे पंतप्रधानपदाचे एक संभाव्य उमेदवार म्हणून पाहिले जाते, त्यांच्या पक्षात आणि राज्यात अशी अवस्था असेल तर विरोधकांची देशभरातील मतदारांमध्ये एकत्रित विश्वासार्हता कशी काय निर्माण होईल?या पार्श्वभूमीवर, तिसऱ्या कार्यकाळात तरी आर्थिक उदारीकरणाचा वेग वाढवा आणि असे झाले तरच भारताच्या वार्षिक अर्थवाढीचा दर सात ते नऊ टक्क्यांच्या वर जाईल, असे सल्ले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गंभीरपणे देणाऱ्या अर्थतज्ज्ञांची संख्या वाढते आहे. पंतप्रधान स्वत: तर 'मी तिसऱ्या कार्यकाळात अमुक तमुक करीन,' असे सांगू लागले आहेतच; पण अर्थतज्ज्ञही असे बोलू लागले तर त्यातून कोणता संदेश जातो, हे कुणालाही सहज समजेल. हे वातावरण बदलून टाकायचे असेल तर विरोधकांना वेगाने एकत्र यावे लागेल आणि ते सगळे मतभेद विसरून एकत्र आले आहेत, हे भारतीय नागरिकांना दिसणे आवश्यक आहे. चार राज्यांमधील विधानसभा निवडणुकांनंतर भाजपचा आत्मविश्वास वाढला आहे आणि 'इंडिया' या विरोधकांच्या आघाडीतील काँग्रेसच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भाजपच्या विजयाचा सगळा भर हा प्रामुख्याने उत्तर आणि पश्चिम भारत तसेच हिंदीभाषिक प्रांत येथील कामगिरीवर अवलंबून आहे. विरोधकांनी तेथेच 'एकास एक' असे उमेदवारीचे सूत्र लवकरात लवकर अमलात आणले, तरच भाजपला आव्हान देता येईल.भारतात काँग्रेस पक्ष जेव्हा प्रबळ होता, तेव्हा हिंदीभाषिक राज्यांमध्ये विरोधक ज्या ज्या वेळी मतभेद विसरून एकत्र आले; तेव्हा त्यांना मोठा विजय मिळाला आहे. हे अगदी १९७७ च्या ऐतिहासिक सत्तांतरापासूनची आकडेवारी पाहिली तरी लक्षात येईल. इतिहासाचा हा स्वयंस्पष्ट दाखला समोर असताना 'इंडिया' ही आघाडी वेगाने जागावाटप करून प्रचाराला आरंभ का करीत नाही, असाच प्रश्न कुणालाही पडेल. समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस, पंजाबमध्ये आम आदमी पक्ष, बिहारमध्ये लालूप्रसाद व नितीश यांचे पक्ष, महाराष्ट्रात शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना यांच्याशी काँग्रेसने लवकरात लवकर अर्थपूर्ण बोलणी करणे आवश्यक आहे. मग जागावाटप आणि त्यानंतर संयुक्त प्रचार मोहीम. काँग्रेसने केवळ मोठ्या विरोधी पक्षांनाच नव्हे तर छोट्या गटांना आणि पक्षांनाही सोबत घ्यायला हवे होते, असे उत्तर भारतातील पराभवानंतर म्हटले गेले. काँग्रेस नेतृत्वाने याचा कसा विचार केला आहे, हे कळायला मार्ग नाही. आता एकीकडे, २२ तारखेला अयोध्येतील समारंभ आणि दुसरीकडे, राहुल गांधी यांची भारत न्याय यात्रा हे देश आणि विशेषत: उत्तर भारत ढवळून काढणाऱ्या दोन मोठ्या घटना या महिन्यात होत आहेत. यातून दोन्हीतून जो देशव्यापी माहोल तयार होईल; त्याचा निकालांवर मोठा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही.

# सावित्रीमाई फुले जयंती व महिला मुक्ती दिवस.

सावित्रीमाई फुले यांचा जन्म आजच्या दिवशी म्हणजेच दि.३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव खंडोजी नेवसे-पाटील तर आईचे नाव लक्ष्मीबाई होते. सावित्रीमाईंची जयंती महिला मुक्ती दिन म्हणूनही साजरी केली जाते. सावित्रीमाईंना महात्मा जोतिरावजी फुलेंनी शिकवले आणि स्त्री शिक्षणाचा पाया रचला. आज सावित्रींच्या लेकी जगात सर्वत्र सर्व क्षेत्रांत आघाडीवर आहेत. याची सुरुवात सावित्रीमाईंमुळे झालेली आहे. कारण त्यांनी शिक्षणमंत्रच आपल्या काव्यसंग्रह- काव्यफुलेमधून दिला-

विद्या हे धन आहे रे, श्रेष्ठ साऱ्या धनाहून।
तिचा साठा जयापाशी, ज्ञानी तो मानती जन।।

म.जोतिरावजी फुलेंचे मूळ आडनाव गोरे होते. पण पेशव्यांनी त्यांचे वडील गोविंदराव फुले यांना पुण्यातल्या फुलबागेची जमीन बक्षीस दिली. म्हणून त्यांचे कुटुंब पुण्यात आले. त्यांच्या फुलांच्या व्यवसायावरून त्यांचे आडनाव फुले असे पडले. जोतिरावांचा सावित्रीमाईंशी विवाह झाला, तेव्हा त्या अवघ्या ९ वर्षाच्या होत्या. शिक्षणसम्राट जोतिरावजी फुले स्वत: शिकले आणि त्यांनी सावित्रीमाईंना शिकवले. दि.१ मे १८४७ रोजी म्हणजे स्वातंत्र्यापूर्वी १०० वर्षांआधी सावित्रीमाईंनी पुण्याच्या मागास वस्तीत एक शाळा काढली. ही त्यांची पहिली शाळा आणि दि.१ जानेवारी १८४८ रोजी भिडे वाड्यात जोतिराव आणि सावित्रीबाईंनी मुलींची शाळा काढली. दलितांच्या व्यथा-वेदना मांडणारी पहिली कवयित्री म्हणून त्यांना अग्रमान द्यायलाच हवा!

इंग्रजी माऊली देई सत्य ज्ञान। शूद्राला जीवन देई प्रेमे।।
इंग्रजी माऊली शूद्रांना पान्हा पाजी। संगोपन आजी करतसे।।
इंग्रजी माऊली तोडते पशुत्त्व। देई मनुष्यत्त्व शूद्रलोका।।

ज्ञानज्योती फातिमाबी शेख याही त्यांच्यासोबत शिक्षिका म्हणून कष्ट उपसत होत्या. ही सर्वार्थाने मुलींची पहिली शाळा ठरली. मागास वस्तीतील शाळा काही दिवसात बंद पडली. या शाळेत सावित्रीमाई मुख्याध्यापिका झाल्या. सावित्रीमाईंना कणाकणातून ज्ञान वेचायला शिकवणाऱ्या जोतीबांचा त्यांच्या जीवनपद्धतीवर सर्वात मोठा प्रभाव होता. ते काव्यसुमनातून सांगताना त्यांनी लिहिले-

काळरात्र गेली। अज्ञान पळाले।।
सर्वे जागे केले। सूर्याने या।।
शूद्र या क्षितिजी। जोतीबा हा सूर्य।।
तेजस्वी अपूर्व। उगवला।।

सावित्रीमाईंच्या या शाळेत सुरुवातीला फक्त सहा मुली होत्या. वर्षभरात ही संख्या जेमतेम ४५ पर्यंत पोहोचली. शाळा काढून मुलींना शिकवायला सुरुवात केली म्हणून सनातन्यांनी आणि उच्चवर्णीयांनी धर्म बुडाला. जग बुडणार अशी फुले दांपत्यावर टीकेची झोड उठवली. सावित्रीमाईंच्या



अंगावर शेण, दगड व विटा फेकले. काही उन्मत्त लोक तर त्यांच्या अंगावर धावून गेले. बहिष्कारही घालण्यात आला. तरीही त्या डगमगडल्या नाहीत. स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे, हे त्यांनी ओळखले. आता त्या अधिक उत्साहाने कामाला लागल्या. सन १८५४ सालीच अस्पृशोद्धारक जोतीरावांना ज्ञानसूर्याची उपमा देऊन सावित्रीमाईंनी त्यांच्या महानतेची प्रचिती दिली-

स्वामी जोतीबांच्या लागे मी चरणी!
त्यांची गोड वाणी मनी घुमे!!
महार मांगाची करते मी सेवा!
आवडीच्या देवा स्मरूनिया!!

केवळ मुलींना शिक्षण देऊन भागणार नाही. अपप्रवृत्तीविरुद्ध लढले पाहिजे. बाल-जरठ विवाह प्रथेमध्ये अनेक मुली वयाच्या १२-१३व्या वर्षी विधवा होऊ लागल्या. अशा मुलींना नवऱ्याच्या चितेवर उडी टाकून सती जावे लागे किंवा त्यांचे केशवपन करून त्यांना कुरूप केले जाई. या सर्व दुष्ट प्रथेला त्यांनी कडाडून विरोध केला आणि शिक्षणसम्राट म.फुलेंनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सावित्रीमाईंनी ते समर्थपणे चालवले. एवढेच नव्हे तर बलात्काराने गरोदर राहिलेल्या महिलांचे बाळंतपण त्या स्वतः करत होत्या. याच ठिकाणी काशीबाई या ब्राम्हण विधवेचे मूल फुले दांपत्यानी दत्तक घेतले आणि त्याचे नाव यशवंत ठेवले. अशा या महान सावित्रीमाईंची काव्य फुले आणि सावित्रीमाईंची भाषणे ही पुस्तके प्रसिद्ध झाली. बहुजनांना अज्ञानाच्या गाढ झोपेतून गदागदा हलवून जागे करताना त्यांनी लिहिले-

बंदी मनुची विद्या घेण्या होती ती उठली।।
ज्ञानदाते इंग्रज आले विद्या शिकूनी घ्या रे।।
ऐसी संधी आली नव्हती हजार वर्षे रे।।
मुलाबाळांना आपण शिकवू आपणही शिकू।।
विद्या घेऊनी ज्ञान वाढवून नीतीधर्म शिकू।।
नसानसातून ईर्षा खेळवू विद्या मी घेईन।।
शूद्रत्वाचा डाग हा माझा निपटून काढीन।।
राज्यात बळीच्या आम्हास विद्या घडो।।
यशाची आमच्या दुंदभी नगारे झडो।।
'इडा पिडा टळो' या कार्यी भट न पडो।।
असे गर्जूनी विद्या शिकण्या जागे होऊन झटा।।
परंपरेच्या बेड्या तोडुनी शिकण्यासाठी उठा।।

काव्यफुलेच्या माध्यमातून रंजल्या-गांजलेल्या दलित-पीडित समाजाला शिक्षणामृत पाजणाऱ्या राष्ट्रपितामह क्रांतीबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांचे विचारधन हीच आपली संपत्ती नव्हे का?

प्लेगने बाधीत रुग्णांची सेवा करताना सावित्रीमाईंनाच प्लेगची लागण झाली. दि.१० मार्च १८९७ रोजी त्या निर्मिकांकी कायमच्या निद्रिस्त झाल्या.

!! जयंती निमित्त सावित्रीमाईंस व त्यांच्या जनोद्धारक कार्यास विनम्र अभिवादन !!

-------------

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**मु. पो. ता. जि. गडचिरोली**
**फक्त मो. नं. ७७७५०४१०८६.**

# भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले ..!

ज्या काळात भारतीय स्त्रियांना समाजात चूल आणि मूल एवढेच स्थान होते. स्त्रियांना चार भिंतीच्या आत बंदिस्त ठेवल्या जात होते. त्या काळात ३ जानेवारी १८३१ रोजी नायगाव तालुका खंडाळा जि. सातारा येथे सावित्रीबाईचा जन्म झाला. सावित्रीबाई फुले ह्या स्वातंत्र्योत्तर काळातील पहिल्या स्त्री शिक्षिका शिक्षण प्रसारक व समाज सुधारक महिला होत्या. सन १८४० सालि त्यांचा ज्योतिराव फुले यांच्याशी विवाह झाला. बहुजनांच्या उद्धारासाठी महात्मा फुले यांनी प्रथमतः आपल्या धर्म पत्नीला म्हणजेच सावित्रीबाईला साक्षर करून १८४८ मध्ये पुणे येथे भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढली या शाळेत सावित्रीबाईला १ जानेवारी १८४८ रोजी या शाळेत शिक्षिका बनविले. देशातून पहिली स्त्री शिक्षिका बनवण्याचा मान सावित्रीबाईंनी पटकावला होता. तेव्हा मनुवादी विचाराच्या नराधमांनी सावित्रीच्या अंगावर शेण -माती ,विटा विस्टा टाकून त्यांना विचलित करण्याचा प्रयत्न केला. पण सावित्रीबाईंनी हे तर माझ्या कार्याबद्दल केला जात असलेला फुलांचा वर्षावच आहे असे सांगून समतेचा ज्वालामुखी आपल्या हृदयामध्ये सतत धगधगत ठेवून आपल्या कार्याला अधिक गतिमानतेने सुरुवात केली. ज्योतिबाच्या समतेच्या ज्योतीवर ज्ञानाची ज्योत सावित्रीबाईंनी पेटवली अंधाराला संपवण्यासाठीच महात्मा फुले यांनी इथल्या जातीवादी विषमतावादी वर्ग व्यवस्थेला उध्वस्त करण्यासाठीच जे समतेचे महायुद्ध पुकारले होते. त्यात सावित्रीबाईंनी उडी घेतली आपल्या संसाराचा त्याग करून इतरांच्या कल्याणासाठी त्या संघर्ष करीत राहिल्या. सावित्रीचे जीवन विषमतेच्या चटक्याने होरपळून निघत होते. पण त्यांचे लक्ष त्यांनी विचलित होऊ दिले नाही. आपला समतेचा लढा सतत तेवत ठेवला हिंदू धर्माच्या सुधारणेसाठी आपले उभे आयुष्य खर्ची घातले. सुधारणेचा भाग पुढे नेत असताना त्यांनी बालविवाह सती प्रथा, जातीभेद ,कर्मकांड याचा धिकार करून विधवा व एकेश्वरवाद याचा पुरस्कार केला. तसेच संमतेची शिकवण सुद्धा समाजाला दिली. तात्कालीन कुमारीकांच्या मुलांची बालहत्या त्या वेळी प्रचंड प्रमाणात होत होते. तेव्हा निष्पाप अर्भकाची हत्या होऊ नये. म्हणून महात्मा फुले यांनी १८५३ मध्ये आपल्या घरात बालहत्या प्रतिबंधक गृहाची सुरुवात केली. तेव्हा सावित्रीबाईंनी त्याचा आनंदाने स्वीकार केला. या पवित्र कार्याने कितीतरी मुलांना त्यांनी जीवदान दिले . फुले दापत्यांना मूलबाळ नव्हते म्हणून त्यांनी काशीबाई नावाच्या एका ब्राह्मण विधेचा मुलगा यशवंत याला दत्तक घेतले होतो .तो पुढे शिकून मोठा डॉक्टर झाला. समाजातील वर्णव्यवस्थेने अति शुद्र ठरवून गावकुवा बाहेर राहण्यास भाग पाडलेल्या अस्पृश्य समाजासाठी १८६८ साली ज्योतिबा व सावित्रीबाईंनी आपल्या घरचा पाण्याचा हौद खुल्ला करून देऊन एक समतेची क्रांतीच केली. जेव्हा पुणे परिसरात १८७५ते१८७७ दरम्यान सतत दुष्काळ पडला होता. शेकडो मुले अन्न म्हणून तडफडून मरू लागली तेव्हा सावित्रीबाईंनी ज्योतिबा सोबत अन्नछत्रे उघडून आंधळे पांगळे व लहान मुले यांना सतत पोटभर जेवण दिले. धनकवडी येथे एक अन्नछत्र उभारले व त्यांची सर्व जबाबदारी सावित्रीबाईंनी स्वतःवर घेतली अनेकांना भूकबळी पासून वाचविले सावित्रीबाईच्या या महान समाजकार्यामुळेच आज महिलावर्ग प्रगतीच्या उंच शिखरावर पोहोचला आहे. हे नाकारून चालणार नाही. सावित्रीबाई फुले त्यांच्या कृती व्यक्त महान कार्यामुळे त्या जगातल्या सर्व स्त्रियांना पुरुषांना आदर्श व्यक्तिमत्व ठरतात. त्याच खऱ्या या देशातल्या विद्येच्या खऱ्या देवता आहेत. आजच्या विज्ञान युगातील शिकलेल्या सवरलेल्या भारतीय स्त्रियांनी सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घेऊन त्यांच्या महान कार्याची व उपकाराची जाण ठेवून त्या दिशेने वाटचाल करणे हेच खरे सावित्रीबाई फुले यांना त्यांच्या जयंतीनिमित्त खरे अभिवादन ठरेल...

-------------

**पत्रकार ,लेखक- सिद्धार्थ तायडे मु .पो. वडनेर भोलजी ता .नांदुरा .जि .बुलढाणा**
**मो .नं.९३०९७६७३८८**

# लेणी संवर्धन- एक गरज

२४ तारखेला दान पारमिता फाउंडेशन या ग्रुप तर्फे शिवनेरी लेणी कार्यशाळा आयोजित केली होती बहीण कविता शिंदे हिच्या आग्रहा मुळेच फक्त तिचा मान राखावा म्हणून मी या कार्यशाळेसाठी येण्याचं कबूल केलं. जळगावहून नाशिक ला गेले आणि तिथून आयु.सुनिल खरे,आयु.प्रविण जाधव आयु.अंभोरे सर यांनी नाशिकच्या सर्वांना सोबत जाता यावे या साठी ठरवलेल्या वाहनाने नाशिक हुन २४ तारखेला सकाळी ७ वाजेला निघालो.सगळेच सोबत असलेले पुरुष आणि महिला मोकळेपणाने बोलत होत्या.एकमेकांशी सगळ्यांनी ओळख करून घेतली.काही तासांनी आम्ही पहिल्यांदा भेटलो आहोत असं वाटतंही नव्हतं. प्रवासात मोकळेपणाने गप्पाटप्पा झाल्या.बोलतचालत लेणीच्या पायथ्याशी केव्हा पोहोचलो कळलं नाही.

जेवणाचे डब्बे, पाणी बॉटल,खराटे,सुपड्या,पोते अशा वस्तू सोबत घेऊन सारे तो डोंगर चढायला सरसावले. सुरवात झाली थोडं अंतर ही गेलो नसेल तेवढ्यात वाटायला लागले थांबावं का खालीच एवढा डोंगर शक्य होईल का चढणं.पण खरे सरांनी प्रोत्साहन दिले.त्यात आमच्या मध्ये ६८ वर्षाचे एक काका काही शंका कुशंका नं घेता डोंगरावर चढाई करायला पुढे झाले हे पाहून तर मी चुपच झाले आणि जोमाने चढाई सुरु केली रस्ता अतिशय खडतर होता.प्रत्येक पाऊल सांभाळून ठेवावे लागत होते अंदाज चुकून चालणार नव्हते.काही वेळा तर पाय टेकायला आधारही सापडत नव्हता. पाय घसरत होता काही वेळा बसून बसून पुढे सरकत होतो दोर,काठी असा आधार घेत पुढ पुढ सरकत होतो.आली का लेणी सर असं अधून मधून विचारत होतो शेवटी जिव मुठीत घेऊन सुरु केलेली ही मोहीम फत्ते झाली.आम्ही लेणी पर्यंत पोहोचलो लेणी च दर्शन होताच त्याचं क्षणी इथपर्यंत पोहोचण्या साठी झालेली दमछाक अगदी विस्मरणात गेली.एक सुंदर रचना आमच्या समोर होती.ती पाहिल्यावर देहभान हरवले आणि इतक्या थकव्यातही सगळ्यांच्या चेहऱ्यावर स्मित हास्य होते.मानसिक समाधान आनंद ओसंडून वाहत होता. लेणी एकाच दगडात कोरलेल्या असतात पण या लेणी खूप मोठं मोठ्या आकारात कोरल्या आहेत. शून्यगार ही मोठे आहेत. त्या वेळी तांदुळाचा भुसा, मोरचुद, गूळ, शेण आयुर्वेदिक वनस्पती यांचा वापर करून लेप तयार करून भिंतीना मुलामा दिलेला होता पण त्या लेपाचे अवशेष अजूनही भिंतीवर शाबूत आहे. लेणी च्या सभागृहा चे वरचे छप्पर अगदी सपाट कोरलेले आहे. शून्यगारा च्या दाराच्या चौकटी ला प्राणी बांधण्या साठी त्या दगडाला अगदी सुबक छिद्रे कोरलेले आहे पहिल्या सभागृहात मध्यभागी स्तुपाच्या आकाराचा घुमट कोरलेला आहे. लेणीमध्ये पोहोचल्या नंतर सुनिल खरे आणि टिम यांनी मिळून लेणी आत मधून खराट्या ने झाडून टाकली.भिंती,सिलिंगस्तूप स्वच्छ केलं,वाटवाघुळा ची घरटी,जाळं जळमटं काढली.आणि लख्ख झालेली लेणी पाहून मन भरून आलं. त्या नंतर त्रिशरण पंचशील घेण्यात आलं.अंभोरे सर,खरे सर,आकाश यांनी बौद्ध धर्मातील पंथ आणि मान्यता या विषयी माहिती दिली.चिवर,भिक्षा पात्र,आणि काठी याचं प्रतिक म्हणजे स्तूप ही माहिती या ठिकाणी कळली.

या लेणी २२०० वर्षा पूर्वी बौद्ध संघाच्या राहण्या साठी सम्राट अशोकाच्या काळात कोरल्या गेल्या. त्या काळच्या धम्म लिपीत, सातवाहन लिपीत या लेण्यावर २२०० वर्षा पूर्वी काही मजकूर कोरलेला आहे. या लिपीचा अभ्यास करणारे, ही लिपी शिकवणारे सुनिल खरे सरांनी या शिवनेरी लेणी वर कोरलेली अक्षरेही वाचून आणि समजावून सांगितली. हाबौद्ध धर्माचा ऐतिहासिक वारसा जतन करणे आवश्यक आहे. या लेण्याची होत असलेली दुरावस्था सहन करण्या जोगी नाही. हा वारसा आज उपलब्ध आहे हा अमूल्य ठेवा आपण सांभाळला पाहिजे. अधून मधून भेटी द्यायला हव्या. स्वछता करायला हवी. या लेखाद्वारे शासनालाही विनंती करते की या ऐतिहासिक दगडी लेण्याचे संवर्धन करण्या कडे लक्ष द्यावे. त्या साठी काही मोहीम हाती घ्यावी.लेणी आणि तेथील शब्द वाचून आणि सरांनी सांगितलेले अर्थ ऐकून क्षणभर वाटले की ही दगडं बोलू लागलीय. काहीतरी सांगू लागली. या शून्यगारात कोणते भिखू कसे साधना करत होते हे सांगू लागली. दगडं आम्हाला पाहून हसू लागली की काय.ही लेणी अलिंगण देतेय आणि आसवं गाळतेय की काय अशी वाटलं क्षणभर.वसंत शिंदे (सातारा )यांच्या या ओळी समर्पक वाटतात दिसतो आहे तसाच असता मूर्ती त्याची घडली नसती. कठोर दिसला जरी जगाला आतुन हळवा असतो कातळ.

-----------

ज्योती उत्तमराव वाघ-
९४०३२५३४६५,
जळगाव.

# सावित्रीमाईची महती, समजून कधी घेती?

सावित्रीमाई फुले ह्या महिलांसाठी क्रांती करून महिलांना मान सन्मान मिळवून देणाऱ्या महिलांच्या उद्धारक आहेतच. परंतु सामाजिक विषमता, अनिष्ट रुढी परंपरा आणि भटशाहीची गुलामी झुगारून सामाजिक क्रांतीच्या थोर क्रांतिकारक ही त्याच आहेत. सावित्रीमाई फुले यांच्या मुळे महिला शिकायला लागल्या. सावित्रीमाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरू करून महिलांना शिक्षण सुरू केले. हे आज सहज वाटत असेल पण जेव्हा सावित्रीमाई व ज्योतीबा फुले यांनी मुलींसाठी शाळा सुरू केली तेव्हा ही खुप मोठी क्रांती होती. कारण मुलींनी महिलांनी शिक्षण घेणे म्हणजे धर्म बुडवण्याचे काम होय. मुली शिकल्या म्हणजे चंचल बनुन कुटुंब व्यवस्था नष्ट होईल. मुली शिकल्या म्हणजे जे अक्षर काढतील त्या अक्षराच्या आळ्या होऊन जेवनाच्या ताटात येतील, मुली शिकल्या म्हणजे त्यांचे नवरे लवकर मरतात अशा अफवा पसरवुन महिलांना कायम गुलामगिरी मध्ये ठेवण्याचे काम विकृत मानसिकतेच्या लोकांनी केले होते. शिक्षणाच्या मागचा उद्देश हा महिलांना केवळ अक्षर ओळख करून देणे एवढाच नव्हता तर स्त्रियांनी अंधविश्वास, पाखंड, भोंदुगीरी, अनिष्ट रुढी परंपरा यामधून बाहेर पडून एक मानव म्हणून आदर्श जिवन जगावे या साठी शिक्षणाच्या माध्यमातून जागृती करण्यासाठी सावित्रीमाई फुले यांनी अंगावर शेणमाती घेऊन मुलींना शिक्षण दिले. मुली महिला शिकल्या पण पण शिक्षणातून जागृत कीती महीला झाल्या? शिकलेल्या महिलांना सावित्रीमाई किती कळाल्या हा संशोधनाचा विषय आहे. कारण हजारो वर्षांपासून देवा धर्माच्या व विषमतेच्या आधारावर मानसिक गुलामी लादुन सर्व सामान्य लोकांना लुबाडून झोळी भरण्याची परंपरा आजही सुरुच आहे. स्वरूप थोडेफार बदलले असेल मात्र वृत्ती तिच आहे. सावित्रीमाई फुले आजही महिला अज्ञान, अंधविश्वास, पाखंड, भोंदुगीरी, फसवणूक होण्याच्या ठिकाणी गर्दी करतात. परंतु महिलांच्या उद्धारासाठी शेणमाती अंगावर घेऊन, कपटी लोकांचा विरोध सहन करून महिलांना सोन्यापेक्षा मौल्यवान जिवन व शिक्षण बहाल करणाऱ्या सावित्रीमाई बद्दल आजही महिला अज्ञानी असतील तर त्या शिक्षणाचा आणि वैभवाचा काय फायदा? आपल्या कडे नैतिकता आणि प्रामाणिक पणा असेल तर आपल्याला साठी ज्याने थोडेफार काही केले तर त्याची जाणीव ठेवणे याला संस्कार म्हणतात. मग सावित्रीमाई फुले यांनी शिक्षणासाठी दु:ख सहन करून महिलांना सर्वोच्च सुख दिले याची जाणीव महिलांना का नसेल? सकाळी उठल्यावर महिलांच्या उद्धारक असलेल्या सावित्रीमाई समोर किती महिला नतमस्तक होत असतील? नतमस्तक होणे सोडून द्या किती शिकलेल्या महिलेच्या घरात सावित्रीमाई फुले यांचा फोटो असेल? जो अंधविश्वास, पाखंड, भोंदुगीरी सावित्रीमाई फुले यांनी झुगारून लावले त्या अंधविश्वास, पाखंडाला पवित्र समजून नित्यनेमाने त्याची अंमलबजावणी करणाऱ्या महिला खरचं सावित्रीमाई च्या लेकी होऊ शकतात का? शिक्षणाने माणूस जागृत होतो सत्य असत्यामधला फरक करतो. परंतु आज शिकलेल्या लोकांना, महिलांना आपल्या उद्धारकर्त्यांबद्दल सहानुभूती, आपुलकी व आदर नसेल तर यांना शिक्षण म्हणावे का? असा प्रश्न उभा राहतो.

शुद्रांना सांगण्याजोगा। आहे शिक्षण मार्ग हा
शिक्षणाने मनुष्यत्व। पशुत्व हटते पहा
इंग्रजी शिकुणी। जातीभेद मोडा
भटजी भारूडा। फेकुनिया

वरील काव्याचा विचार केला तर माणसाला शिक्षीत होऊन जातीभेद नष्ट करायचा असेल तर भटजीचे भारुड फेकुन द्यावे हाच उपाय सावित्रीमाई फुले यांनी सांगितला आहे. परंतू चुकिच्या आणि कुचकामी बाबींचा संबंध धर्माशी जोडून चुकिच्या व कुचकामी गोष्टींवर बोलले तर लोकांच्या भावना दुखतात आणि चांगल्या व प्रगतीच्या सर्वसमावेशक आणि विज्ञाननिष्ठ गोष्टी आजही धर्मांशी जोडल्या जात नाहीत. यालाच मानसिक गुलामी म्हणतात आणि हिच गुलामी कायम रहावी म्हणुन महिलांना शिक्षण, हक्क अधिकार नाकारले होते. आजही गुलामी मोठ्या प्रमाणात असल्याने महिलांना व लोकांना सावित्रीमाई फुले या धर्मविरोधी वाटतात. म्हणून च तर अंगावर शेणमाती घेऊन, स्वतः च्या सुखावर पाणी फिरवून स्त्रियांच्या उद्धारासाठी झटणाऱ्या सावित्रीमाई फुले अजूनही महिलांच्या घरात आल्या नाही ही खूप मोठी शोकांतिका आहे.

गोट्याला शेंदुर। फासुन तेलात
बसवी देवात। दगड तो
धोंडे मुले देती। नवसा पावती
लग्न का करती। नारी नर

वरील सावित्रीमाई चे विचार आजही लोकांना धर्माच्या विरोधात वाटतील. आज विज्ञानाची प्रगती झाली तरीही अनेक महिला पुरुष अज्ञान युगात वावरत आहेत. मानवतेपेक्षा, माणुसकी पेक्षा दगडाला जास्त किंमत दिली जाते, अनेक स्वतः ला सुशिक्षित समजणारे जोडपे सुख समाधानासाठी, पुत्रप्राप्ती साठी आजही अनेक प्रकारचे नवस करतात. ह्या गोष्टी शिक्षणाला व विज्ञानाला काळीमा फासणाऱ्या आहेत परंतु अधोगतीकडे घेऊन जाणाऱ्या आहेत. याची जाणीव सावित्रीमाई फुले यांनी दिडशे वर्षाअगोदर करून दिली. पण काय आजही आम्हाला ते कळाले का? सावित्रीमाई फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून जागृती व जागृती च्या माध्यमातून प्रगती यासाठी आपले आयुष्य खर्ची घातले. जर शिक्षण हे प्रगती साठी असेल. आणि तेच नाकारले असेल तर याचा अर्थ एकंदरीत महिलांची सर्व प्रगतीच नाकारली गेली होती हे सत्य आहे. मग महिलांसाठी सावित्रीमाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांनी शिक्षण सुरू करून अडीअडचणींना सामोरे जाऊन महिलांना प्रगतीचे द्वार खुले करून दिले. पण ते बंद कोणी आणि का केले यावर महिला कधी बोलणार? महिलांना शिक्षण, हक्क अधिकार नाकारून मानसिक गुलाम बनवणारे किती निच मानसिकतेचे असतील याची प्रचिती येते. या निच माणसिकतेचा विरोध महिला करणार का? की सावित्रीमाई फुले यांच्या कार्याला व विचारांना पायदळी तुडवून निच रुढी परंपरा विषमतावादी व अंधविश्वास पसरवणाऱ्या गोष्टीच स्विकारून आपली गुलामी कायम ठेवतील?

नांगर धरती। शेती जे करती
मठ्ठ ते असती। मनु म्हणे
करू नका शेती। सांगे मनुस्मृती
धर्माज्ञा करीती। ब्राम्हणास

सावित्रीमाई फुले यांना महात्मा जोतिबा फुले यांनी शिक्षीत केल्याने आपला शत्रु निर्धारित करता आला, चुकिच्या गोष्टी कोणत्या चांगल्या गोष्टी कोणत्या यामधील फरक करता आला. जेव्हा स्त्रियांना अनेक सामाजिक बंधने होती तेव्हा सावित्रीमाई फुले यांनी बंधने तोडून मानसिक स्वातंत्र्य मिळवणे म्हणजे क्रांतीच होती. मनुस्मृती नावाचे पुस्तक एवढे विषारी आणि किळसवाणे आहे की जो कोणी थोडाफार का होईना बुद्धीचा वापर करतो तो व्यक्ती मनुस्मृती नावाचे पुस्तक जाळल्या शिवाय राहणार नाही. शेती करणे हे हिन दर्जाचे काम आहे, शेती करणारे लोक मठ्ठ असतात असे मनुस्मृती सांगते. म्हणुन ब्राम्हणांनी शेती करू नये अशी आज्ञा मनुस्मृती ब्राम्हणाला देते. जी मनुस्मृती विषमता आणि गुलामी पेरते ती मनुस्मृती सावित्रीमाई फुले यांनी नाकारली परंतु त्याच मनुस्मृती नुसार आजही शिकलेल्या महिला स्वत:चे वर्तन करतात तेव्हा त्या शिक्षणाची किव येते.

गुलामगिरीचे दु:ख नाही
जराही त्यास जाणवत नाही
माणुसकी ही समजत नाही
तयास मानव म्हणावे का?

वरील काव्यामध्ये सावित्रीमाई फुले यांनी जी गुलामगिरी मांडली आहे त्याचा अर्थ व गांभीर्य आज सुशिक्षित लोकांना खरचं कळाले का? गुलामगिरी असुनही जर ती जानवत नसेल, गुलामगिरी चा विरोध होत नसेल, आणि माणुसकी ला जर किंमत नसेल तर त्यांना माणूस म्हणायचे का? बऱ्याच लोकांना माणुसकी याचा अर्थ आजही माहिती नाही. गोर गरिबांना मदत करणे याला माणुसकी म्हणत नाहीत तर गोरगरिबांना सोबत घेणे याला माणुसकी म्हणतात. थोडक्यात विषमता बाळगून मानुसकी दाखवता येत नाही तर समता प्रस्थापित करून माणुसकी जपता येते. हा या मागचा उद्देश आहे. सावित्रीमाई फुले यांचे विचार व कार्य आजही लोकांना दिशादर्शक असुन मानवाचा उद्धार करणारे आहेत. परंतु मुळ समस्या एकच आहे ती म्हणजे सावित्रीमाई फुले यांचे विचार समजून घेऊन त्याची अंमलबजावणी होत नाही. जर सावित्रीमाई फुले यांचे विचार समजून घेऊन प्रत्येकाने त्यांच्या शिकवणुकी प्रमाणे लागले तर प्रत्येकाचा उद्धार होऊन देशामध्ये समतेची, विचाराची, शिक्षणाची व विज्ञानाची क्रांती झाल्या शिवाय राहणार नाही. पण खंत एखच आहे आपले आयुष्य दुसऱ्या साठी खर्ची घालणारी सावित्रीमाई फुले आजही आजही अपवाद वगळता महिलांना कळाल्यांच नाही. सुशिक्षित महिला सावित्रीमाई समजून त्यांना वैचारिक वंदन करतील तोच खरा जागृतीचा दिवस होईल. सावित्रीमाई जयंती निमित्ताने त्यांचे विचार व कार्य जनमानसात पसरवुन त्यांना वैचारिक अभिवादन करणे हे प्रत्येक सुशिक्षित व्यक्तीचे कर्तव्य आहे. सावित्रीमाई फुले जयंती च्या समस्त भारतीयांना मंगलमय सदिच्छा..

---------------

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

# सामाजिक शिक्षीका- सावित्रीमाई फुले

सावित्रीमाई फुले यांचे कार्य व विचार येथील व्यवस्थेने मर्यादित करून ते समाजा पर्यंत पोहचुच दिले नाही. सावित्रीमाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरू करून महिलांना फक्त सुशिक्षित केले नाही तर सावित्रीमाई फुले या सामाजिक शिक्षीका होत्या. त्यांनी संपूर्ण मानव समाजाला सामाजिक शिक्षण देऊन सामाजिक क्रांती केली हे विसरून जमणार नाही. मुलींसाठी शिक्षण सुरू करणे हे जेवढे क्रांतीचे व काम होते तसेच अनेक काम ज्याला धर्मांने आणि शास्त्रांनी मान्यता दिली नव्हती अशा संवेदनशील चालीरीती सावित्रीमाई फुले यांनी हानुन पाडल्या. धर्म आणि शास्त्राच्या नावाखाली महिलांचे मानसिक, शारीरिक शोषण होऊन महिलांना केवळ हीन वागणूक मिळत होती. महिलांचे जगणे असह्य व वेदनेने भरलेले होते. तत्कालीन धर्म आणि शास्त्र महिलांना मानव मानायला तयार नव्हत्या. धर्मग्रंथ, संस्कृती, रुढी परंपरा याच्या गुलामी मध्ये स्त्री जगतच होती वरुन पुरुषांचीही गुलामी तिच्या वर होतीच. म्हणजे महिलांचे सामाजिक स्थान काय होते याची कल्पना न केलेली च बरे. सावित्रीमाई च्या विचाराचा व कार्याचा विचार केला तर त्यांचे श्रेष्ठत्व आपल्या लक्षात येते. आज लोकांची जेवढी कमाई नाही तेवढा कर त्यावेळी फुले कुटुंब ब्रिटिश सरकारला देत होते. म्हणजे फुले कुटुंब काही गरीब नव्हते. आजच्या भाषेत बोलायचे झाल्यास श्रीमंती असल्यावर अडचणी दुर होतात असे बोलले जाते. मग सावित्रीमाई चे पती अर्थात महात्मा जोतिबा फुले हे गजगंड श्रीमंत असताना. फुले दाम्पत्याच्या वाट्याला दु:ख का आणि कोणामुळे आले याचा विचार केला तर मन सुन्न होते. समाजासाठी गजगंड श्रीमंती सोडून गरिबीचे जिवन जगणे पसंत केलेल्या माऊलीचे काळीज केवढे असेल? इतरांना जागृत करण्यासाठी स्वतः च्या सुखाचा, श्रीमंतीचा, घराचा त्याग करून इतरांना सुख देण्यासाठी मनाची तयारी करणे हे साध्या व्यक्तीचे काम नाही. एक साधा विचार करा आजही पोटाला पोटभर मिळत असेल तर घरातील बाई गल्लीतील सांडपाण्या बद्दल माणसाला बोलु देत नाही. आपल्याला काय करायचे त्यांचे ते बघुन घेतील आपल्याला त्यांच्या मध्ये पडायचे नाही असे नवऱ्याला सांगते. अशी आजची माणसिकता असताना दिडशे वर्षा अगोदर सावित्रीमाई फुले यांनी जोतीरावांना कसे सहकार्य करून कसे जोतीरावां सोबत उभी राहली असेल? महिलांसाठी, समाजातील चुकिच्या रुढी परंपरा, मानसिक गुलामगिरी विरोधात आवाज उठवला नसता तर पैशाच्या ठिगात आणि फुलांच्या सुंगधात सावित्रीमाई राहली असती. मग उपाशी राहुन अंगावर शेणमाती का घेतली असेल याचा विचार कधी करायचा? सावित्रीमाई च्या या विचारातून सामाजिक प्रेरणा घेऊन आज आपण काही धडा घेणार आहोत का? सावित्रीमाई फुले ह्या शिक्षीकेसोबतच त्या इतिहासाच्या अभ्यासक होत्या, कवयित्री होत्या. सावित्रीमाई च्या काव्यामधुन बहुजन महापुरुषांचा, संताचा जयजयकार दिसुन येतो. सावित्रीमाई च्या काव्यातून मनुस्मृती सारख्या विषारी पुस्तकावर आसुड ओढून समतेची शिकवण प्रस्थापित केली आहे. अनिष्ट रुढी परंपरा याच्या विरोधात कणखर भुमिका घेऊन दैववाद व अंधविश्वास झुगारून विज्ञानवादाची शिकवण देणाऱ्या सावित्रीमाई होत्या. समाजाच्या चुकिच्या संस्कृती मुळे विधवा महिलांना कुमारवयीन मातांना अत्यंत हलाखिचे जिवन जगावे लागत होते. देवदासी सारख्या माणुसकी ला काळीमा फासणाऱ्या प्रथा येथे सुरू होत्या. त्यांना आळा घालुन समाजावर मानवतावादी संस्कार घालण्याचे काम केले. केशोपन सारख्या प्रथा बंद करून महिलांना सामाजिक सन्मान मिळवून देण्यासाठी महात्मा फुले सोबत उभ्या राहून नाव्ह्यांचा संप घडवून आणुन एक वेगळी क्रांती केली. विधवा मातांना सन्मान व सुरक्षित बाळंतपण होण्यासाठी स्वतः च्या घरी प्रसुती गृह तयार करून त्याची रितसर जाहिरात केली आणि आपल्या पतीच्या कार्याला मनोभावे सहकार्य केले. अनेक विधवांना आधार देऊन त्यांच्या जीवनात आनंद आणि सुख निर्माण करण्याचे काम सावित्रीमाई फुले यांनी केले. विधवा स्त्रियांचा उपभोग घेणाऱ्यांना काही समाजात कोणतीही शिक्षा



नव्हती परंतु पशुप्रमाने अत्याचार करून विधवा गर्भवती राहली तर तिच्या दु:खत वेदना देण्यात धन्यता मानणारी संस्कृती सावित्रीमाई फुले यांनी हानुन पाडली. सर्वजन एकाच वंशाचे आहेत म्हणून भेदाभेद हानुन पाडला पाहिजे. भेदभाव हानुन पाडण्यासाठी आणि आणि विधवांना सन्मान मिळण्यासाठी आंतरजातीय विवाह व विधवा पुर्नविवाह सारखे क्रांतीकारी पाऊल सावित्रीमाई फुले यांनी उचलले. विधवा महिलेची प्रसुती करून त्यालाच दत्तक घेऊन योग्य शिक्षण व संस्कार घालुन समाजाचा डॉक्टर तयार केला. डॉक्टर हा सेवेसाठी असतो. सेवेच्या नावाखाली मेवा खाण्यासाठी नाही. हि शिकवण स्वतः च्या मुलाला देऊन गरजु लोकांची सेवा करण्याचे संस्कार घातले. प्लेग सारख्या महामारी मध्ये यशवंत अर्थात सावित्रीमाई फुले यांच्या मुलाने रुग्णांची सेवा केली. प्लेग ही संसर्गजन्य महामारी आहे हे माहित असुन ही रुग्णांना स्वतः च्या खांद्यावर उचलून दवाखान्यात नेण्याचे मर्दानी काम सावित्रीमाई फुले यांनी केले. सावित्रीमाई चे कार्य व विचार बघितले तर आजही सामाजिक संस्कार घालून आजही सामाजिक शिकवण देण्याचे काम करत आहेत. परंतु अंधविश्वास, पाखंड यामधुन सावित्रीमाई फुले यांनी समाजाला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला पण आजही सावित्रीमाई च्या कार्याची व विचाराची जाण नसल्यामुळे लोक वैचारिक दृष्टीने मागास आहेत. वैचारिक दृष्टीने परिपक्व होण्यासाठी आणि सामाजिक जडणघडण करण्यासाठी सावित्रीमाई चे विचार आजही प्रेरणा देतात. म्हणून सावित्रीमाई फुले खऱ्या अर्थाने सामाजिक शिक्षीका ठरतात. अशा या महान शिक्षीका आणि करोडोंची असलेल्या माईची आज जयंती. जयंतीच्या सर्वांना मंगलमय सदिच्छा..

-----------

रोशनी भाऊराव देबाजे

## आमदार किसन कथोरे यांच्या प्रयत्नाने बदलापुर मध्ये होणार श्रीराम महोत्सव साजरा

उल्हासनगर / प्रतिनिधी : अयोध्येमध्ये उभारण्यात आलेल्या राममंदिर लोकार्पण सोहळ्या निमित्त अंबरनाथ तालुका अध्यात्मिक उत्सव समिती व आमदार किसन कथोरे मित्र मंडळ यांच्या सयुक्त विद्यमाने गांधी चौकातील मराठी शाळेच्या मैदानात १७ जानेवारी ते २२ जानेवारी दरम्यान श्रीराम महोत्सव साजरा केला जाणार आहे. बदलापुर येथे आमदार किसन यांच्या प्रयत्नाने १७ जानेवारी ते २२ जानेवारी दरम्यान श्रीराम महोत्सवा निमित्ताने कार्यक्रम होणार असुन या मध्ये दररोज संध्याकाळी ५ ते ९ वाजे पर्यंत भजन व श्रीराम यांच्या जीवनावर आधारित चित्राचे प्रदर्शन ठिक ठिकाणी मांडन्यात येणार आहे. या कार्यक्रमात लोकप्रिय गायक गायिका सहभागी होणार आहेत. तर २२ जानेवारी रोजी शहरात भव्य रॅलीचे आयोजन केले असुन या रॅलीत ढोल ताशे बँड पथक घेवुन श्रीरामाची मुर्ती असलेला रथ हे रॅलीचे स्वरुप असणार आहे. दरम्यान उल्हासनदी काठावर महाआरती होणार असुन ही आरती ऐतिहासीक ठरणार आहे. तेव्हा या कार्यक्रमात हजारो नागरिकानी उत्साहात सहभागी व्हावे असे आवाहन आमदार किसन कथोरे यांनी केले आहे. दरम्यान या कार्यक्रमाच्या निमित्ताने २ लाख ५१ हजार नक्षीदार दिवे घरोघरी वाटन्यात येणार आहेत .

# भीमा कोरेगाव ! सलाम शूर सैनिकांना मानवंदना... !

कोरेगावची लढाई ही महाराष्ट्राच्या पुणे जिल्ह्यामधील कोरेगाव भिमा या गावात भीमा नदीच्या काठावर झालेली एक ऐतिहासिक लढाई आहे. ही लढाई १ जानेवारी १८१८ रोजी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी आणि मराठा महासंघाच्या पेशवा गटामध्ये झाली होती. ब्रिटिशांच्या बाजूने एकूण ८३४ सैनिक होते, ज्यांचे नेतृत्व सेनापती कॅप्टन फ्रान्सिस एफ. स्टाँटन करीत होता. इंग्रजांच्या सैनिकांत 'बॉम्बे नेटिव लाइट इन्फेंट्री तुकडी'चे सुमारे ५०० महार जातीचे सैनिक होते, काही युरोपियन व इतर काही सैनिक होते. तर मराठ्यांच्या बाजूने २८,००० सैनिक होते, ज्यांचे नेतृत्व सेनापती पेशवा बाजीराव दुसरे करीत होते. मराठ्यांच्या सैनिकांत मराठा, अरब व गोसाई या सैनिकांचा समावेश होता. दुसरे बाजीराव पेशवे यांच्या नेतृत्वाखालील सैन्य कंपनीच्या ताब्यात असलेल्या पुण्यावर हल्ला करण्याच्या मार्गावर असताना, अनपेक्षितपणे त्यांना कंपनीचे सैन्य आडवे आले, जे पुण्यातील ब्रिटीश सैन्याला मदत देण्यासाठी निघाले होते. पेशव्यांनी कोरेगावात घुसखोरी करणाऱ्या सैन्यावर हल्ला करण्यासाठी सुमारे २,००० सैनिक पाठवले. कॅप्टन फ्रान्सिस स्टॉन्टन यांच्या नेतृत्वाखालील कंपनीच्या सैन्याने जवळजवळ १२ तास लढाई केली. मोठ्या ब्रिटीश सैन्याच्या आगमनाच्या भीतीने पेशव्यांच्या सैन्याने शेवटी माघार घेतली. ही लढाई इंग्रज-मराठा युद्धाच्या मालिकेतील तिसऱ्या इंग्रज - मराठा युद्धाचा भाग होती. या युद्धाच्या मालिकेने पेशव्यांची राजवट संपली. यानंतर पुढे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता जवळजवळ संपूर्ण पश्चिम, मध्य आणि दक्षिण भारतात पसरली गेली. पेशवाईच्या काळात अस्पृश्यतेचे पालन मोठ्या प्रमाणावर होत होते व महारांना,अत्यंत हीन वागणूक दिली जात असे, याला विरोध म्हणून महार सैनिक आत्मसन्मासाठी ब्रिटिशांच्या बाजूने पेशवे व मराठ्यांविरूद्ध लढले आणि विजयी झाले. १८०० च्या दशकांत पुण्याचे पेशवे, ग्वाल्हेर संस्थानाचे शिंदे, इंदूरचे होळकर, बडोद्याचे गायकवाड आणि नागपूरचे भोसले असे अनेक तुकड्यांत मराठा साम्राज्य विभागलेले होते, त्यापैकी ग्वाल्हेर, इंदूर, बडोदा व नागपूर हे मराठा साम्राज्याचे गट ब्रिटिश साम्राज्यात सामील झालेली होती. कोरेगाव भिमाच्या युद्धानंतर ब्रिटिशांनी सैनिकांच्या स्मरणार्थ भीमा नदीच्या काठी ७५ फूट उंच विजयस्तंभ उभारून त्यावर कंपनीच्या ४९ सैनिकांची नावे कोरली. यामध्ये २० शहीद व ३ जखमी महार सैनिकांची नावे आहेत. या स्तंभावर लिहिले आहे - 'जपश`ष ींहश ढीळींाहिा`ष ींहश ईीळींळीह –ीू`ष ींहश एरीींह'. महार सैनिकांच्या सन्मानार्थ येथील विजयस्तंभाला मानवंदना देण्यासाठी दरवर्षी १ जानेवारी रोजी महाराष्ट्रासह देशभरातून बौद्ध (विशेषतः पूर्वाश्रमीचे महार), अन्य दलित, शीख व इतर जातीचे लोकही लाखोंच्या संख्येने येत असतात. बुद्धमूर्ती व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा समोर ठेवून बुद्धवंदना घेऊन शहीद सैनिकांच्या जयस्तंभाला मानवंदना दिली जाते. आजच्या दिनी अशा शूर सैनिकांना मानवंदना...

प्रविण बागडे
*************
नागपूर
भ्रमणध्वनी -
९९२३६२०९१९

# 'रेझिंग डे' निमित्त २ जानेवारी ते ८ जानेवारी पर्यंत लातूर पोलिसांकडून विविध कार्यक्रमाचे आयोजन.









दिवंगत पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी दोन जानेवारी १९६१ रोजी महाराष्ट्र पोलिस विभागास ध्वज सुपूर्त केला होता. त्या दिनानिमित्त महाराष्ट्र पोलिस विभागाच्या वतीने आज (मंगळवार) रेझिंग डे साजरा केला जात आहे. त्यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दिवंगत पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी दोन जानेवारी १९६१ रोजी महाराष्ट्र पोलिस विभागास ध्वज सुपूर्त केला होता. त्या दिनानिमित्त महाराष्ट्र पोलिस विभागाच्या वतीने आज (मंगळवार) रेझिंग डे साजरा केला जात आहे. त्यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २४ तास ऑन ड्युटी असणाऱ्या पोलिसांचे कामकाज कसे चालते याविषयी विद्यार्थ्यांना, सर्वसामान्य लोकांना माहिती व्हावी, यासाठी 'भेट पोलिस स्टेशनला' हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

यात जिल्ह्यातील प्रत्येक पोलिस स्टेशनअंतर्गत असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या पोलिस ठाण्यांना भेट आयोजित केल्या आहेत. त्यांना पोलिस खात्याच्या कामकाजाविषयी माहिती देण्यात आले आहे. त्याचबरोबर पोलिसांकडील शस्त्रसाठ्याचे प्रदर्शनही भरविण्यात आले. सर्व पोलिस ठाण्याच्या हद्दीत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी त्यांच्या हद्दीतील शैक्षणिक संस्थांना भेट देऊन विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम व अन्य कायद्यांविषयी मार्गदर्शन करणार आहे. महिलावरील अत्याचार व स्त्रीभ्रूण हत्या जनजागृतीविषयक चर्चासत्रा घेण्यात येणार आहे. गुन्ह्यातील किंमती ऐवज प्रदान कार्यक्रमविविध गुन्ह्यात अनेकदा किंमती ऐवज गुन्हेगारांकडून जप्त केला जातो. असा मुद्देमाल कोर्टाच्या आदेशांने संबधित मालकाला दिला जातो. रेझिंग डे निमित्त असा मुद्देमाल मूळ फिर्यादींना परत देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

## उल्हासनगरातील स्वच्छता मोहिमे कडे राज्यमंत्री कपिल पाटील यांचा कानाडोळा

उल्हासनगर / प्रतिनिधी : राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यभरात सखोल स्वच्छता अभियान राबवन्याचे आदेश दिले आहेत. त्याच अनुषंगाने उल्हासनगर महापालिकेने ही स्वच्छता मोहिम सुरु केली आहे. कँप ३ येथील डॉ . बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वारापासुन स्वच्छता मोहिमेला सुरुवात झाली तेव्हा केंद्रिय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील हे अंबरनाथ कडुन कल्याण कडे जात असताना उल्हासनगर च्या फस्ट गेट आनंदनगर येथे आमदार कुमार आयलानी व आयुक्त अजिज शेख यांनी मंत्री पाटील यांना गाडी खाली उतरन्याची विनंती केली. परंतु मंत्री महोदयानी खाली न उतरता यांच्या बोलन्या कडे कानाडोळा करुन निघुन गेले. दरम्यान भाजपाच्या मंत्र्याने त्यांच्याच आमदाराच्या शब्दाला मान दिला नसल्याने या बाबत शहरात चर्चा होत आहे.राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यभर सखोल स्वच्छता मोहिम राबवन्याचे आदेश दिले आहेत. याच आदेशाची अमलंबजावणी करत उल्हासनगर महापालिकेचे आयुक्त अजिज शेख , अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली व नोडल अधिकारी गणेश शिंपी यांच्या देखरेखीत प्रभाग अधिकारी , स्वच्छता निरीक्षक व सफाई कर्मचारी यांनी डॉ . बाबासाहेब आंबेडकर प्रवेश द्वारापासुन सखोल स्वच्छता मोहिमेला सुरवात करत के बी रोडने पुढे जात असतानाच केंद्रिय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील यांचा ताफा अंबरनाथ कडुन कल्याण कडे येत होता. तेव्हा या स्वच्छता मोहिमेत चमकेशगिरी करणारे आमदार कुमार आयलानी यांनी कपिल पाटील यांची गाडी थांबवली आणि गाडीतुन खाली येण्याची विनंती केली. परंतु हे मंत्री महोदय खाली न उतरताच निघुन गेले. तेव्हा तेथे उपस्थित असलेले आयुक्त आणि सर्व अधिकरी हे बघत उभे राहीले. दरम्यान या मंत्र्यानी दोन मिनिटे गाडी खाली उतरुन आमदार आयलानी यांचा मान राखायला हवा होता . परंतु त्यांनी आयलानी यांचा मान राखला नसल्याने आमदार यांना काडीचीही किमंत भाजपामध्ये नसल्याचे दिसुन येते.

# रतनजी टाटांचा वाढदिवस यशवंतराव नाट्यगृहात उत्साहात साजरा.

## रक्तदान शिबीर आणि विविध पुरस्काराचे वितरण.

भारताचे जगप्रसिद्ध उद्योगपती रतनजी टाटां यांचे राज्य सरकार आणि मुंबई महानगरपालिकेने सेल्फी पॉइंट तयार करावेत.

**कार्यक्रमाचे आयोजक इंडीया मीडिया लिंक अँड इव्हेंटस् मॅनेजमेंटचे कार्यकारी संचालक, ज्येष्ठ पत्रकार व समाजसेवक के.रवि.दादा यांची मागणी**









मुंबई / प्रतिनिधी:- भारताचे जगप्रसिद्ध उद्योगपती रतनजी टाटा यांचा ८६ वा वाढदीवस मुंबईतील माटूंगा येथील येशवंतराव नाट्यगृहात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. इंडीया मीडिया लिंक अँड इव्हेंट मॅनेजमेंटचे मॅनेजिंग डायरेक्टर के. रवि (दादा) यांनी वाढदिवस सोहळ्याचे आयोजन केले होते.स्वामी बिजवनदास गुरुजी,पूर्व पोलिस ऑफीसर धनराज वंजारी, अभिनेता अल्ली खान प्रसिद्ध शायर सागर त्रीपाठी, ड.सुभाष सुर्वे, सुशील जाधव, समाजसेवक. आरीफ भाई आदि उपस्थित होते. शरक्तदान शिबीर आणि विविध पुरस्काराचे यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत वितरण करण्यात आले.भारताचे जगप्रसिद्ध उद्योगपती रतनजी टाटां यांचे राज्य सरकार आणि मुंबई महानगरपालिकेने सेल्फी पॉइंट तयार करावेत अशी मागणी या वेळी कार्यक्रमाचे मुख्य आयोजक इंडीया मीडिया लिंक अँड इव्हेंटस् मॅनेजमेंटचे कार्यकारी संचालक, ज्येष्ठ पत्रकार व समाजसेवक के.रवि.दादा यांनी केली आहे. कार्यक्रमात सागर त्रिपाठी धनराज वंजारी,सुर्वे निवेदक उमेश कामत अनेकांनी रतन टाटांसह के रवि दादांचे आपल्या भाषणात भरभरून कौतुक केले. दरम्यान इतिहासात पहिल्यांदाच रतन टाटांजीनवर लिहिलेल्या गाण्याचे प्रदर्शन यावेळी करण्यात आले. पहिल्यांदाच रतन टाटांवर मुशहरा, कविता व प्रसिद्ध हास्य कलाकार दिवेश शिवडकर मार्फत रतन टाटांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे आयोजक के.रवि दादां यांनी उपस्थितांना मीडियांच्या माध्दमातून देशाला सामाजिक संदेश देताना जनतेस आव्हान केले २८ डिसेंबर रोजी रतन टाटांच्या वाढदिवसा निमित्त फक्त १० मिनिटे जनतेने आप आपल्या घरातील लाईट बंद केल्या तर देशामध्ये अर्बो युनिट विजेची बचत होईल आणि टाटा पावरची निदान मुंबई शहाराला स्वस्तात विज मिळेल. रवि दादां यांनी पंतप्रधान नरेन्द्र मोदींना विनंती केली आहे की येणाऱ्या वर्षांत रतन टाटांचा वाढदिवस देशाने सामाजिक पातळीवर वेग वेगळ्या स्वरूपात साजरा करावा अशी मागणी के.रवि दादा यांनी केली आहे. यावेळी डॉ. विजय सानप, राहुल रवि, राम तांबे, पत्रकार राजेंद्र साळसकर, विलास घडशी,पत्रकार तानाजी कांबळे, शरद रणपिसे,प्रभाकर वडियार, प्रो. हेमंत सामंत, नितीन जाधव, दिपक पडीये,डॉ. रतन पवार,रमजान शिद्धिकी, विक्रांत कशप्प. राहुल खैरे, राज्या सोनटक्के, आदीनी विषेश मेहणत घेतली.

# अन् गोकुंदा ग्रामपंचायतचा झिंगाट कारभार पुन्हा चव्हाट्यावर.!

जुन्या कामावर नविन काम दाखवत १कोटी ४० लाखांचा शासकीय निधीवर दरोडा.!





किनवट / शेख शौकत :- तालुक्यातील सर्वात मोठी आणि मालदार ग्रामपंचायत असणाऱ्या गोकुंदा ग्रामपंचायत अंतर्गत सावळा गोंधळ नेहमीचं चाललेला असतो. काही वर्षं आधी तंटामुक्ती भवन बांधकामातील लाखो रुपयांचा भ्रष्टाचार उघड झाला आणि गुन्हे नोंद झाल्याने भ्रष्टाचाराला कुठे तरी आळा लागेल असे वाटले होते,परंतु म्हणतात ना स्वभावाला औषध नसते; तसेच भ्रष्टाचाराच्या पैशांचा नशेत मदमस्त झालेल्यांना सर्व सामान्य गोरगरीब जनतेसाठी आलेल्या विकास निधीचे काय घेणे की देणे.? सर्व सामान्य जनतेचा सर्वांगीण विकासासाठी जनतेने निवडून दिलेल्या ग्रामपंचायत गोकुंदा येथील सरपंच, उपसरपंच व सदस्य् यांनी सप्टेंबर २०२२ ते आजपर्यंत १५ वा वित् आयोग, जनरल निधी व इतर कामाचा आलेला विकास निधी वर जुनीच कामे नविन दाखवून अंदाजे १ कोटी ४० लाख रूपयाचा अपहार केलेला आहे आणि सदरील प्रकरणाची चौकशी करून कार्यवाही करणे बाबत लेखी निवेदन गट विकास अधिकारी यांना देण्यात आले आहे.

तालुक्यातील सर्वात गब्बर आणि मालदार ग्रामपंचायत असलेल्या मौजे गोकुंदा ग्रामपंचायत येथील सरपंच, उपसरपंच व सदस्य् यांनी संगनमत करून ग्रामसेवकला हाताशी धरत १५ वा वित् आयोग,मालमत्ता कर आणि विविध प्रकारचे करचे माध्यमाने जमा झालेल्या जनरल निधी व दलित वस्ती सुधार योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी विकास योजना,अल्प संख्यांक विकास योजना आणि इतर विकास निधीतुन थातुर-माथुर पध्दतीने कामे करून व अंदाजपत्रकाप्रमाणे कामे न करता तसेच काही जुनी १४ व्या वित्त आयोगाची कामे नविन दाखवून निधी हडपण्याच्या उद्देशाने केली आहेत. तसेच काही कागदोपत्री दाखवून निधी हडप केलेला आहे. तसेच कुठल्याही कामाचे ई-टेंडर न करता आर्थीक् स्वार्थासाठी स्वतः गुत्तेदारी केलेली आहे.

तसेच १५ वा वित् आयोग व जनरल निधी व तसेच इतर विकास निधीमधून सरपंच अनुसया सिडाम, उपसरपंच शेख हैदर शेख मुसा,सदस्य् ज्ञानेश्वर् सिडाम, प्रमोद मुनेश्वर्, निर्मला कांबळे, कल्पना भरकाडे, संजय सिडाम, शेख बिस्मिल्लाबी अब्दूल गणी, ज्योतीबा गोणारकर, जिजाबाई मुकाडे, दत्ता भिसे, वच्छलाबाई नागभिडे, रहिमा शेख सलिम, रेखा दांडेगावकर, पुण्यरथा बोडके, यांनी संगणमताने निधी कामे न करताच बिले उचलुन अंदाजे १ कोटी ४० लाख रूपयाचा अपहार केलेला आहे व घराचा व खुल्या जागेचा कर जमा करून पावती न फाडता कर रजिस्टरला (निल) बे-बाकी करून अपहार केलेला आहे. त्यामुळे कर स्वरूपात येणारा निधीचा उपयोग स्वस्वार्थासाठी करत आहेत. तसेच इतर विकास कामासाठी आलेला निधी व १५ वित् आयोग निधी मधुन काही कामे जुन्याच कामांना नविन दाखवून निधी हडप केलेला आहे.

सदरील प्रकरणाची सखोल चौकशी करून दोर्षीवर योग्यती कार्यवाही करत फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करावे आणि जोपर्यंत चौकशी पूर्ण होत नाही तोपर्यंत सर्व अभिलेखे जप्त करून प्रशासक लावत कारभार आपल्या मार्गदर्शनाखाली करण्यात यावा. सदरील प्रकरणी आपण कसलीही दखल न घेतल्यास गट विकास अधिकारी यांचा कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने तिव्र स्वरूपाचे जन आंदोलन उभारण्याचे सर्व सामान्य ग्रामस्थांनी बोलून दाखवला आहे. चौकशी अधिकारी असलेल्या विस्तार अधिकारी ढवळे साहेब यांच्याकडे नांदेड जिल्हा परिषदेची खुपचं मोठी जबाबदारी असल्याने ते नेहमीचं नांदेड येथे राहतात त्यांना तिथल्या कामातून वेळ मिळाला तर ते चौकशी करतात आणि चुकून वेळ मिळालाच तर चौकशीचा नावावर ग्रामसेवकांना अभिलेखे सादर करण्यास वारंवार वेळ देवून चौकशीची ऐशीतैशी होईल याची पुरेपूर काळजी घेताना ते दिसतात.चौकशी अधिकारी बदलण्याची मागणी केली तरी गट विकास अधिकारी साहेब चौकशी अधिकारी बदलत नाहीत यात काय गौडबंगाल आहे हा पि.एच.डी करणाऱ्यांसाठी संशोधनाचा विषय नक्कीचं होवू शकतो.

## भारत मातेच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या क्रांतिकारकांच्या स्मृतीला उजाळा देऊन अभिवादन

उल्हासनगर / प्रतिनिधी : १९४२ च्या भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जुलमी ब्रिटिश राजवटीला उलथून लावण्यासाठी मुरबाड तालुक्यातील सह्याद्री पर्वत रांगेत वसलेल्या सिद्धगडावर २ जानेवारी रोजी झालेल्या रणसंग्रामात आपल्या प्राणांची आहुती देणारे क्रांतिकारक हुतात्मा वीर भाई कोतवाल आणि हिराजी गोमाजी पाटील यांच्या स्मृतीला उजाळा देत क्रांतिकारक हुतात्मा वीर भाई कोतवाल स्मारक समिती उल्हासनगरच्या वतीने सकाळी ठिक -०६ वाजून ०२ मिनिटांनी क्रांतिकारक हुतात्मा वीर भाई कोतवाल स्मारक, उल्हासनगर -४ येथे आयोजित करण्यात आलेल्या बलिदान दिनाच्या कार्यक्रमात आदरांजली वाहून अभिवादन करण्यात आले.यावेळी क्रांतिकारक हुतात्मा वीर भाई कोतवाल स्मारक समितीचे अध्यक्ष मनोज कोरडे यांनी क्रांतिकारक हुतात्मा वीर भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांच्या नावाच्या घोषणा देत १९४२ च्या भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दलच्या स्मृतींना उजाळा दिला. तर समितीचे सल्लागार एम.आर.निकम आणि अशोक जगताप यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी स्मारक समितीचे सचिव अनिल बोरनारे, उपाध्यक्ष संदिप सायखेडे, कार्याध्यक्ष अंकुश श्रीखंडे तसेच सल्लागार रामकिसन रावताळे,राजन चव्हाण, मधुकर कोकाटे ,रविंद्र बोरनारे आणि मंगेश सायखेडे, दिनेश सोनावळे,संदिप रावताळे व भुषण सोनावळे आदि सदस्य उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE